# दिनांक 8.12.2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली सुधारीत संभाव्य यादीवरील दिनांक 13.12.2023 पर्यंत प्राप्त झालेले आक्षेप व अनुपालन

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | आक्षेप/तक्रार/विनंती अर्ज | प्राप्त अर्जावर अनुपालन |
|---|---|---|---|
| 1 | श्री. संजय सुखदेवराव डोळस, ग्रामपंचायत कर्मचारी, ता. सावनेर जि.नागपूर कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक-04.12.2023 | सन 2020 व 2021 च्या प्रसिध्द झालेल्या यादयपैकी दोन दा प्रसिध्द झाले होते परंतु कागद पडताळणी मध्ये नाव कमी झाले असून सन 2019 च्या सरळ सेवा भर्तीतील आरोग्य सेवक पदाच्या जागा शिल्लक असल्यास माझ्या अर्जाचा विचार करावा. 10 टक्के ग्रामपंचायत कर्मचारी मधून निवड करण्यात यावी. त्याच प्रमाणे सन 2020-21 च्या सरळ सेवा भर्तीतील 28 जागा पैकी फक्त 24 जागांची यादी प्रसिध्द झाली असून उर्वरित 4 जागा मध्ये आरोग्य सेवक पद जर शिल्लक असल्यास माझ्या अर्जाचा विचार करावा. | ग्रामपंचायत कर्मचारी 10 टक्के पदभरती करिता एकूण 24 पदे उपलब्ध आहे शासन अधिसुचना क्रमांक व्हीपीएम-2004 प्र.क्र.261/पंरा-5 दिनांक 19/08/2005 नुसार सेवाजेष्ठता व शैक्षणिक अर्हतेनुसार पदभरती करण्यात येत आहे. आपण सादर केलेले टंकलेखन प्रमाणपत्र शासन मान्य नसल्यामुळे कनिष्ठ सहा. या पदाकरीता पात्र ठरत नाही तसेच जेष्ठतेनुसार आरोग्य सेवक पदाचे पद नसल्यामुळे आपल्या अर्जाचा विचार करण्यात येत नाही. |
| 2 | श्री. मोहन दे. मोहतुरे, मु.पो. खुबाळा, ता. सावनेर कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक-04.12.2023 | श्री.डिगडोह (देवी) ही नगर परिषद झाल्यामुळे त्याची नियुक्ती रद्द करून मी पात्र असल्यामुळे माझी निवड करण्यात यावी. | शासन अधिसुचना क्रमांक व्हीपीएम-2004 प्र.क्र.261/पंरा-5 दिनांक 19/08/2005 अन्वये सेवा जेष्ठतेनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार वर्ग -3 चे पद उपलब्ध नाही. |
| 3 | श्री. चेतन जगजीवन शंभरकर, ग्रामपंचायत कर्मचारी, हेवती, ता. उमरेड कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक-06.12.2023 | सेवाजेष्ठता यादीमध्ये सन 2023 च्या अनुक्रमांक 102 वर नाव आहे. माझे शिक्षण बी.कॉम. III year झालेले असून माझे MS-CIT झालेले आहे. त्यामुळे माझे कनिष्ठ सहाय्यक लेखा या पदाकरिता शिक्षण पूर्ण दिसून येत आहे. तरी माझी या पदाकरिता निवड करण्यात यावी | कनिष्ठ सहा. लेखा या पदाकरीता मराठी टंकलेखन प्रमाणपत्र आवश्यक असल्यामुळे कनिष्ठ सहा. लेखा या पदाकरीता पात्र ठरत नाही |
| 4 | श्री. दिनेश सहदेव जिभे, ग्रा.पं.कर्मचारी, गुमगाव.ता.सावनेर कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक-11 .12.2023 | दिनांक 08/12/2023 रोजी निघालेल्या सुचना व्दारे दिनांक 28/11/2023 ला प्रसिध्द करण्यात आली होती. त्या यादीमध्ये माझे नाव अ.क्र.17 वर असून विस्तार अधिकारी (सां)या पदाकरिता अ.जाती प्रवर्गातुन निवड करण्यात आली होती. परंतु दिनांक 08/12/2023 रोजी निघालेल्या सुचना व्दारे दि.28/11/2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली अंतिम यादी रदद करण्यात आली असून विस्तार अधिकारी (सां) हे पद बदलवुन मला कनिष्ठ सहाय्यक(लिपिक) या पदाकरिता विचाराधीन म्हणून निवडले आहे.त्यामध्ये बदल कसा काय करण्यात आला आहे याबाबत खुलासा करण्यात यावा. तसेच सामाजिक आरक्षण हे पदोन्नती करिता रदद झाले असुन सरळसेवा पदभरती करिता लागू असल्यामुळे ग्रा.पं कर्मचारी यांचे सरळसेवा पदभरती मध्ये समायोजन आहे.त्यामुळे ग्रा.पं कर्मचा-यांकरिता राखुन ठेवण्यात आलेल्या 10 टक्के रिक्त पदांच्या बिंदु नामावलीमध्ये विस्तार अधिकारी(सा) हे पद अ.जा प्रवर्गाकरिता राखीव करण्यात आले तरीपण माझे पद वगळून खुला प्रवर्ग पदाकरिता विचाराधीन करण्यात आले. याबाबत माझे आक्षेप अनुपालन करून पुर्तता करण्यात आली. तसेच आपण निवड केलेले विचाराधीन असलेले सर्व कर्मचारी हे बिंदु नामावली नुसारच घेण्यात आले मग एकाच माइया पदाबददल कसा काय? माझे शिक्षण B.A-Economic,MAEconomics MS-CIT,झाले असून माझी विस्तार अधिकारी (सां) या पदाकरिता निवड करण्यात यावी. | शासन अधिसुचना क्रमांक व्हीपीएम-2004 प्र.क्र.261/पंरा-5 दिनांक 19/08/2005 सेवा जेष्ठता व शैक्षणिक अर्हतेनुसार श्री. संजय ठाकूर यांना विस्तार अधिकारी (सां) या पदावर नियुक्तीकरीता विचाराधीन ठेवण्यात आले आहे. करीता आपली सेवा जेष्ठतेनुसार व शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेनुसार कनिष्ठ सहा. लिपीक या पदाकरीता प्रस्तावित केलेले आहे.<br>ग्रामविकास विभाग शासन अधिसुचना 19 ऑगस्ट 2005 मधील तरतुदीनुसार 10 टक्के पदे जेष्ठतेनुसार व शैक्षणिक पात्रतेनुसार सवर्गनिहाय भरण्यात येत असल्याने उक्त तरतुदीनुसार सामाजिक आरक्षण लागु नाही. |
| 5 | श्री. उमेश दिपक सोनटक्के, ग्रामपंचायत कर्मचारी, ता. उमरेड, जि. नागपूर कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक-11.12.2023 | शैक्षणिक पात्रता बी.कॉम. व टंकलेखन, MS-CIT हे शिक्षण 2022 च्या आजवरचे शैक्षणिक कागदपत्रे आहेत. 10 टक्के ग्राम पंचायत कर्मचारी निवड करीत असतांना माझ्या अर्जाचा विचार करावा. | शासन अधिसुचना क्रमांक व्हीपीएम-2004 प्र.क्र.261/पंरा-5 दिनांक 19/08/2005 अन्वये सेवाजेष्ठता नुसार पद उपलब्ध नसल्यामुळे अर्जाचा विचार करण्यात येत नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | श्री.संदिप सुधाकरजी बोंदाडे,ग्रामपंचायत कर्मचारी,किन्ही (धा) पं.स.हिंगणा<br>कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक- 12.12.2023 | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पद मिळण्याबाबत दिनांक 04.12.2023 रोजी आक्षेप घेतला होता परंतु प्रसिध्द झालेल्या यादीमध्ये दिनांक 21.10.2023 शासनाचे परिपत्रकात दिलेल्या सुचनेनुसार स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पद देता येत नाही.असे नमुद असल्यामुळे माझे समाधान झाले असून पहील्या व अंतिम यादी मध्ये माझ्या नावाचा कनिष्ठ लिपिक पदाकरिता विचार करण्यात आला होता मी लिपिक पदावर काम करण्यास तयार आहे परंतु नविन संभाव्य यादी प्रकाशित झाली असून त्यामध्ये माझ्या नावाचा विचार कंत्राटी ग्रामसेवक या पदाकरिता विचाराधीन आहे.मी या पदाकरिता अर्ज केला नसल्याने मला पहिल्या जुन्या अंतिम यादीमध्ये प्रसिध्द झालेले पद कनिष्ठ लिपिक असुन ते पद अंतिम ठेवण्यात यावे व हे पद मी घेण्यास तयार आहे. | शासन अधिसुचना क्रमांक व्हीपीएम-2004 प्र.क्र.261/पंरा-5 दिनांक 19/08/2005 अन्वये सेवाजेष्ठता नुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार श्री.संदिप सुधाकरजी बोंदाडे यांना कंत्राटी ग्रामसेवक या पदाकरीता विचाराधीन ठेवण्यात आलेले आहे. |
| 7 | श्री. विलास महादेव कोहळे, ग्रामपंचायत कर्मचारी, डेगमा (खु.) त. हिंगणा<br>कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक-12.12.2023 | दिनांक 21/08/2023 च्या सुधारित संभाव्य यादीवर दिनांक 25/08/2023 च्या अर्जानुसार माझी कंत्राटी ग्रामसेवक पदावर निवड करण्यात आलेली नाही.माझ्या पेक्षा कमी सेवा झालेल्या कर्मचाऱ्याची कंत्राटी ग्रामसेवक पदावर निवड करण्यात आली. | शासन अधिसुचना क्रमांक व्हीपीएम-2004 प्र.क्र.261/पंरा-5 दिनांक 19/08/2005 अन्वये श्री. विलास महादेव कोहळे, सेवाजेष्ठता व शैक्षणिक अर्हतेनुसार पशुधन पर्यवेक्षक या पदावर निवड करण्यात आलेली आहे. |
| 8 | श्री. दत्ता अंकुशराव भोयर, ग्रामपंचायत कर्मचारी ग्रामपंचायत बोथली, ता.नागपूर ग्रामीण जिल्हा, नागपूर कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक-12.12.2023 | जिल्हा परिषद, नागपूर मार्फत 10 टक्के ग्रामपंचायत कर्मचारी भरती सन 2023 करिता दिनांक 8/12/2023 ला प्रसिध्द सुधारित संभाव्य यादीमध्ये अनु क्रमांक 166 वर स्थापत्य अभियांत्रिकी या पदाकरिता विचाराधीन उमेदवार म्हणून निवड झालेली आहे. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/ कुठल्याही पदाकरिता इच्छुक नसून माझे ऐवजी त्या पदाकरिता पुढील पात्र उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे. यावर माझा आज व पुढे भविष्यात कुठलाही आक्षेप वा उजर राहणार नाही. करिता मला 10 टक्के ग्रामपंचायत कर्मचारी मधून नियुक्ती देण्यात येवू नये व त्या पदाकरिता पुढील पात्र उमेदवारास प्राधान्य देण्यात यावे. | श्री. दत्ता अंकुशराव भोयर, ग्रामपंचायत कर्मचारी ग्रामपंचायत बोथली, ता.नागपूर ग्रामीण जिल्हा, येथील कर्मचारी संबंधिताने दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी केलेल्या अर्जाबाबत नोंद घेण्यात आलेली आहे पुढील कार्यवाही करण्यात येईल" |
| 9 | श्री.दलिराम शिवचरण चौधरी ग्रामपंचायत खैरी(पन्नासे) ता.हिंगणा कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक-12.12.2023 | ग्रामपंचायत खैरी (पन्नासे) येथे कार्यरत कर्मचारी असुन 20 वर्षापासून कार्यरत आहे.माझी शैक्षणिक अर्हता नुसार कर्मचारी 10 टक्के ग्रामपंचायत निवड यादीमध्ये माझे शिक्षण Contruction Supervisor चे शिक्षण झालेले आहेत व D.ed प्रथम वर्ष नापास झालेले आहे.करिता माझे संपुर्ण शिक्षण ग्रा.पं 10 टक्के यादीमध्ये समाविष्ट करण्यात यावे. | ग्राम विकास विभागाचे शासन पत्र क्र. दिनांक 21/09/2023 अन्वये 31/12/2022 पर्यंतचे झालेले शिक्षण ग्राहय धरणेबाबत निर्देश आहे. संबंधीताचे शिक्षण Contruction Supervisor हे प्रमाणपत्र दि. 02/03/2023 चे असल्याने विनंती मान्य करण्यात येत नाही. |
| 10 | श्री.हितेंद्र.मोरध्वज उके ग्रामपंचायत कर्मचारी ता.डिगडोह (देवी) कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक-12.12.2023 | ग्रामपंचायत डिगडोह (देवी) ता. हिंगणा येथील कार्यरत कर्मचारी श्री.हितेंद्र.मोरध्वज उके यांनी दिनांक 28/11/2023 ला प्रसिध्द करण्यात आलेल्या ग्रामपंचायत कर्मचा-यांमधून 10 टक्के पदभरती करिता सुधारीत संभाव्य निवड यादी सन 2023 वर लेखी आक्षेप नोंदविण्यात आहे.माझी 10 टक्के भरती प्रकिया ही सन 2019 पासून सुरू झालेली असून दिनांक 20/11/2023 पर्यंत सर्व कागदपत्र पडताळणी व दिनांक 28/11/2023 चे अंतिम यादी प्रसिध्द होत पर्यत सदर सर्व यादीवर आक्षेप मागविण्यात आलेले होते.तसेच ग्रामपंचायत 10 टक्के पदभरतीची प्रक्रिया 09/10/2023 अगोदर झालेली आहे. ग्रामपंचायत डिगडोह(देवी) चे रुपांतर दिनांक 09/10/2023 ला झालेले आहे.परंतु आजपर्यंत आम्ही ग्रामपंचायत कर्मचा-यांचे समायोजन चे कोणतेही प्रस्ताव शासनास प्रस्तावित नाही.म्हणजे | नगरविकास विभाग शासन राजपत्र असाधारण क्र. 44 दिनांक 09/10/2023 अन्वये तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद, नागपूर याचे आदेश क्र. जिपना/पंचा/आस्था-13/5247/2023 दिनांक 11/10/2023 अन्वये नागपूर जिल्हयातील ग्रामपंचायत डिगडोह देवी या महसुली गावातील नागपूर जिल्हा परिषदेच्या सर्व मत्ता,हक्क व दायीत्व (तिने केलेला कोणताही करार किंवा संविदा या खालील हक्क व दायीत्वे धरून ) डिगडोह देवी या नगरपरिषदेकडे हस्तातरीत करण्यात आलेले असल्यामुळे तेथील सर्व संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांची सेवा नगरपरीषदेकडे हस्तातरीत करण्यात आलेली आहे. संबंधीत कर्मचारी सद्यास्थितीमध्ये हे ग्रामपंचायतचे कर्मचारी नसल्यामुळे ग्रा.पं 10 टक्के कर्मचारी भरती करीता पात्र ठरत नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मला कोणतेही शासकिय नौकरी लागलेली नाही. आपले दिनांक 20/11/2023 ला प्रसिध्द झालेल्या यादीमधील माझे ग्रामसेवक पदाकरिता नाव कमी करणे म्हणजे माझे वर अन्याय करण्यासारखे होईल .<br>नगरपरिषद मध्ये समायोजन करिता आतापर्यंत कोणतेही प्रकिया झाली नसुन प्रस्ताव सुध्दा गेलेला नाही.व माझे वय वाढत आहे.आता सुध्दा मी ग्रामपंचायत कर्मचारी आहे. म्हणुन दिनांक 28/11/2023 ला नमुद यादी प्रमाणे मला कंत्राटी ग्रामसेवक पद देण्यात यावे. | |
| 11 | श्री.धनराज डोमाजी पाटील ग्रामपंचायत कर्मचारी ता.रामटेक कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक-13.12.2023 | ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग,मंत्रालय मुंबई दि.19 ऑगस्ट 2005 अधिसुचनेनुसार शैक्षणिक अर्हता अनुभव इ.आधारे जेष्ठतेच्या आधारे ज्याने ग्रामपंचायत कार्यालयात दहा वर्षाहुन कमी नाही.इतकी सलग पुर्ण वेळ सेवा केलेले जिल्हा सेवेतील वर्ग 3 व वर्ग 4 च्या कोणत्याही पदावर नियुक्तीस पात्र असेल सदर नियुक्ती थेट ग्राम पंचायत कर्मचा-यांमधुन संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून करण्यात येईल अशी तरतुद आहे.<br>ग्रामपंचायत कर्मचा-याकडून 10 टक्के पदभरती करिता सुधारित संभाव्य निवड यादी सन सन 2023 दिनांक 08.12.2023 रोजी जिल्हा परिषद नागपूर यांनी प्रसिध्द केली आहे. सदर संभाव्य निवड यादी वर्ग 3 च्या पदाकरिता असून यादीमधील पात्र -अपात्र उमेदवार हे नियमित ग्रामपंचायत कार्यालयात कार्यरत असतांना विविध प्रकारचे शिक्षण व्यावसायीक शिक्षण / प्रशिक्षण घेतल्याचे निदर्शनास येत आहे. उमेदवारांच्या नावापुढे दर्शविण्यात आलेली शैक्षणिक अर्हता व व्यावसायीक अर्हता यशवंतराव चव्हाण मुक्त विदयापीठ अंतर्गत घेतलेले शिक्षण प्रशिक्षण तसेच संगणक व टंकलेखन चे प्रशिक्षण हे नियमित उपस्थित राहून घेण्यात येणारे असल्याचे समजते. त्यामुळे ग्राम पंचायत कार्यालयात नियमित कर्तव्यावर असतांना शाळा कॉलेज व इतर ही ठिकाणी नियमित उपस्थित राहून शिक्षण घेण्याकरिता संबधित ग्रामपंचायतीची परवानगी घेतली किंवा नाही. | ग्रामपंचायत कार्यालयामार्फत पडताळणी करून, प्राप्त प्रस्तावामधुन संबंधित ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची शैक्षणिक , व्यावसायीक अर्हता व सेवाजेष्ठतेनुसार निवड करण्यात आलेली आहे. |
| 12 | राजकुमार श्रावण भोयर ग्रा.पं कर्मचारी सालेशहरी सालेशहरी(पु) ता भिवापुर कार्यालयास अर्ज प्राप्त दिनांक-13.12.2023 | माझी शैक्षणिक अर्हता B.A pass ,MS-CIT,आहे त्यामुळे मी कनिष्ठ सहाय्यक लिपिक या पदाकरिता पात्र आहे.सा.प्र.वि विभाग शासननिर्णय संकिर्ण 1114/प्र.क्र.0200/16अ दि.4/09/2015 प्रकल्पग्रस्ताकरिता लागू केला आहे.माझे सन 1997-98 या वर्षात गोसेखुर्द प्रकल्पात शेती/घर भुसंपादीत केली त्यानुसार मी प्रकल्पग्रस्त कर्मचारी असल्याने कनिष्ठ सहाय्यक पदाकरिता पात्र आहे. | शासन अधिसुचना क्रमांक व्हीपीएम-2004 प्र.क्र.261/पंरा-5 दिनांक 19/08/2005 कनिष्ठ सहा.लिपीक या पदाकरीता टंकलेखन प्रमाणपत्र आवश्यक असल्यामुळे कनिष्ठ सहा. लिपीक या पदाकरीता पात्र ठरत नाही. तसेच प्रकल्पग्रस्त करीता ग्रामपंचायत 10 टक्के कर्मचारी पदभरतीकरीता शासन निर्णयात तरतुद नाही. |

दिनांक - 18/12/2023

( विपुल जाधव )
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद, नागपुर

(सौम्या शर्मा,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपुर